नियं.फौ.खटला क्र. १०४/२०२४
सरकार – वि. - विनोद तुमळाम
नि.क्र. २१

<u>**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ६**</u>

<u>**मी शपथेवर खरे सांगतो की,**</u>

**नाव – गोपाल आनंदराव कोसरे** ,
**वय –** ४७ वर्ष, **कामधंदा** - पोलीस हवालदार ,
**सध्या नेमणुक-** पोलीस स्टेशन दिघोरी, ता. लाखांदुर, जिल्हा भंडारा.

<u>**सरतपास- श्रीमती ए. सी. बुराडे सरकारी वकील यांचेमार्फत-**</u>

१. अपराध क्र. २८२/२०२४ चा तपास मला दि. २८.०८.२०२४ रोजी मिळाला. तपास मिळाल्यानंतर सदर गुन्हयाचे केस पेपर मी वाचले. त्यानंतर सदर गुन्हयातील घटनास्थळाचा पंचनामा कारवाई करणेकामी मौजा पिंपळगाव कोहळी येथे गेलो. त्यांनतर हजर असलेले दोन पंचांना गुन्हाचे हकीकत सांगुन ते पंच घटनास्थळ पंच म्हणुन हजर राहण्यास तयार झाल्याने त्यांना सुचनापत्र दिले. आता मला नि. क्र. १२ वरील सुचनापत्र दाखवण्यात आले त्यावर, माझी व दोन पंचाची सहया आहेत, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

२. त्यानंतर घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला नि. क्र. १३ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला त्यावर, माझी व दोन पंचाची सहया आहेत, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर घटनास्थळाचे फोटो घेतले. त्यानंतर आरोपीला पोलीस स्टेशनला हजर राहण्याबाबत सुचनापत्र दिले. त्यानंतर गुन्हयामध्ये कलमवाढ केली त्याबाबत न्यायालयात पत्र देखील पाठविले होते. आता मला कलमवाढीबाबत न्यायालयातमध्ये दाखल केलेले पत्र दाखवण्यात आला त्यावर माझी व सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि. क्र. २२** देण्यात येत आहे.

३. त्यानंतर फिर्यादी व साक्षदारांचे बयाण घेतले. त्यानंतर तपासाअंती दोषारोपत्र तयार करुन न्यायालयात दाखल केले.

४. मी साक्षदार क्र. ४ ईश्वरदास मन्साराम सयाम यांचे बयाण त्यांच्या सांगीतल्याप्रमाणे नोंदविले होते. त्यांनी त्यांच्या बयाणामध्ये अधोरेखीत भाग अ सांगीतला होता. सदर अधोरेखीत भाग ला **नि. क्र.२३** देण्यात येत आहे.

५. आरोपीला पाहील्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला**

<u>**उलटतपास आरोपीचे वकिल श्री. व्ही. पी. खोब्रागडे यांचे मार्फत -**</u>

६. सदर गुन्हयाचा तपास मला दि. २७.८.२०२४ रोजी मिळाला होता. गुन्हयाचा तपास आम्हाला पोलीस निरीक्षक यांच्या तोंडी आदेशाप्रमाणे देण्यात येते, त्याबाबत लेखी आदेश नसतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर वेळेवर हजर असलेल्या लोकांचे सहया आम्ही पंचनाम्यावर घेतो. हे म्हणणे खरे आहे की, पंच कृष्णा नानाजी परशुरामकर याला आम्ही घटनास्थळीच सुचनापत्र दिले. हे म्हणणे खरे आहे

की, आरोपी हा फिर्यादी यांचा सख्खा जावई आहे. अनुसया सयाम हे आरोपीची कोण आहे हे मी पेपर पाहुन सांगु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, सदरची घटना ही आरोपीची पत्नी फिर्यादी म्हणजेच त्यांच्या वडीलांच्या घरी राहत असल्यामुळे झालेल्या वादामुळे घडली. फिर्यादीचे नाव मला सांगता येणारे नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा नेहमी दारु पिवून राहायचा.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षदार क्र. ४ ईश्वरदास मन्साराम सयाम यांचे बयाण मी माझ्या मताप्रमाणे नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना पोलीस स्टेशनला बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, पंचाच्या सहया देखील पोलीस स्टेशनमध्येच घेतले होते. मी आरोपीचे पत्नीचे बयाण नोंदविले होते. आरोपीचे पत्नीचे नाव काय आहे हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेबद्दल काहीच माहीत नाही.

८. तपासादरम्यान मला असे निष्पण झाले होते की, आरोपी हा त्याच्या पत्नीला दारु पिवून मारहाण करीत होता, त्यामुळे आरोपीची पत्नी ही घटनेच्या एक ते दिड महीन्यापुर्वीपासुन फिर्यादी यांच्या घरी म्हणजेच त्यांच्या वडीलांच्या घरी पिंपळगाव कोहळी येथे राहत होती. आता जे मी सांगीतले आहे त्याबद्दल मी तपास केला होता.

**उलटतपास संपला**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत
स्वा/-
(प्रविण पी. यादव)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लाखांदुर.

लाखांदुर.
दिनांकः १०/०७/२०२६